Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# परंडा तालुक्याच्या विकासात साखर कारखान्याचे योगदान

**प्रा. हरिश्चंद्र सं.तिंबोळे**
स्कूल ऑफ अर्थ सायन्स,
पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर
harish.timbole@gmail.com

**प्रस्तावना**:

परंडा तालुक्याच्या विकासात भैरवनाथ साखर कारखान्याचे योगदान महत्त्वाचे आहे. अवर्षणप्रवण भागातील तालुका ते धरणांचा तालुका अशी नवी ओळख परंडा तालुक्याने निर्माण केली आहे. परंडा तालुक्याची लोकसंख्या १ लाख ४० हजार आहे. मागील दोन वर्षापासून ऊसाच्या क्षेत्रात वेगाने वाढ होत असून २०२०-२१ या आर्थिक वर्षात ५ हजार ३२३ हेक्टर क्षेत्र ऊसाखाली होते तर २०२१-२२ वर्षात १४ हजार ८१२ हेक्टर झाले(कृषी विभाग) असून आज परंडा एक बागायती तालुका ओळखला जात आहे. परंडा तालुक्याच्या विकासात साखर कारखान्याचे योगदान अभ्यासताना पीक पध्दतीतील बदल लक्ष वेधून घेणारी आहे. ऊस क्षेत्रात दरवर्षी दुप्पटीने वाढ होत असून ग्रामीण बेरोजगारी सुध्दा कमी होत आहे. शेतकरी आणि कामगार यांच्या राहणीमानात सुधारणा झालेली आहे. परंडा तालुक्यात साखर कारखान्याशिवाय इतर उद्योंगाचा विकास होत आहे. भैरवनाथ साखर कारखाना, बाणगंगा सहकारी साखर कारखाना आणि इंद्रेश्वर साखर कारखान्यामुळे परंडा तालुक्याच्या विकासाला चालना मिळाली असून आज खंडसरी, गुळ, मद्य, खत उत्पादन करणारे सह उत्पादन करणारे प्रकल्प सुरू झाले आहेत


**संशोधन उद्देश:**

- साखर कारखाने आणि विकास याचा सबंध अभ्यासणे.
- परंडा तालुक्यातील साखर कारखान्याच्या समस्या अभ्यासणे.
- परंडा तालुक्याच्या विकासात साखर कारखान्याच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- लोकांच्या राहणीमानात झालेला बदल अभ्यासणे.
- साखर उत्पादनाबरोबर इतर उपउत्पादनांचे उत्पादन सुरू झाले आहेत का याचा अभ्यास करणे.

**परंडा तालुक्याचे स्थान:**

उत्तर १८ ते १८ उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार ७५ पुर्व ते २९ पुर्व रेखावृत्ता दरम्यान असून उत्तरेस जामखेड, पूर्वेस भूम व बार्शी, दक्षिणेस माढा आणि पश्चिमेला करमाळा तालुका आहे. परंडा तालुक्याचे क्षेत्रफळ ८६७.६० चौ किमी असून लोकसंख्या १ लाख ४० हजार आहे. परंडा तालुक्यात ९५ गावांचा समावेश होतो.

नकाशा क्र. १ उस्मानाबाद जिल्हा




उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण १३ कारखाने आहेत. यापैकी ९ कारखाने २०१७-१८ गळीत हंगामात सुरू होते. या सर्व साखर कारखान्यांनी मिळून ११ लाख, ९ हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळपातून १० लाख ३१ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे.

**अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाचे महत्त्व :**

भारतातील ६८ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी कृषीवर अवलंबून आहे. १९५० मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ५३ टक्के होता. परंतु सन २०२१ मध्ये कृषी क्षेत्राचा २०.२ टक्के पर्यंत कमी झाला आहे. भारतात हवामान अनुकूलतेनुसार विविध पिके पिकवली जातात. जलसिंचन उपलब्ध असलेल्या प्रदेशात प्रामुख्याने ऊस पीक घेतले जाते. ऊसाच्या वजनात घट होत असल्याने सर्व साखर कारखाने ऊस उत्पादक क्षेत्रात उभारले जातात. ऊसापासून साखर, गुळ, खंडसरी, इथेनॉल, मद्य, मळी, बायोगॅस, बॅगेज, चिपाडे, वीज कंपोस्ट खत इत्यादी उपउत्पादने साखर कारखान्यांतून घेतली जातात. ऊस या कच्चा मालापासून १० उत्पादने मिळतात. हे उद्योग क्षेत्रात क्रांतीकारी पाऊल आहे. नॅनो

तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास साखर कारखाने भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा होतील. इथेनॉल वीज व बायोगॅस उत्पादनात वाढ केल्यास भारताच्या परकीय चलनाची बचत होईल. उत्पादन खर्चात बचत होऊन जास्त नफा कमविणारा उद्योग म्हणून साखर कारखान्यांची ओळख निर्माण होईल.

भारतात पहिला सहकारी साखर कारखाना नगर जिल्हयातील प्रवरानगर येथे स्थापन झाला तेव्हापासून महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे एक प्रमुख साधन म्हणून साखर कारखान्यांकडे पाहिले जाते. ऊस उत्पादनात अग्रेसर राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखला जाते. सहकारी आणि खाजगी असे एकूण २०२ कारखाने महाराष्ट्रात आहेत. साखर कारखान्याचे वितरण असमान स्वरूपाचे आहे. कोकण विभागात साखर कारखान्याचे नाहीत. पश्चिम महाराष्ट्र आणि अवर्षण भागात जास्त कारखाने आहेत तर विदर्भ आणि खानदेशात कारखातही संख्या कमी आहे.

**परंडा तालुक्यात साखर कारखान्याचा विकास:**

उस्मानाबाद जिल्हा कमी पर्जन्य असलेल्या प्रदेशात येतो. याच जिल्हयातील एक मागास तालुका म्हणून परंडा ओळखला जातो. परंडा तालुक्याच्या समावेश अवर्षणप्रवण प्रदेशात होतो. परंडा तालुक्यात २००८ पुर्वी एकही साखर कारखाना नव्हता. परंतु सीना कोळेगाव धरणामुळे परंडा आणि करमाळा तालुक्यात सिंचनाक्रांती झाली. जलसिंचन सुविधेमुळे तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र वाढले. येथील शेतकरी मोठ्या प्रमाणात ऊसाची शेती करू लागल्याने परंडा तालुक्यात ३ साखर कारखाने सुरू झाले असून या साखर कारखान्यामुळे तालुक्यातील लोकांचे सामाजिक व आर्थिक विकास झाला आहे.

**परंडा तालुक्यातील पहिला साखर कारखाना** :

उस्मानाबाद जिल्हयातील परंडा तालुक्यातील २००८ नंतर ३ साखर कारखाने सुरू झाले असून भैरवनाथ साखर कारखान्याची सुरूवात २००९ रोजी झाली. या कारखान्यांने गाळप सुरू केल्यानंतर बाणगंगा सहकारी साखर कारखाना आणि इंद्रेश्वर साखर कारखाना सुरू झाले तरी अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याअनुषंगाने परंडा तालुक्याची निवड अभ्यास विषय म्हणून केली आहे. २००८ पुर्वी परंडा तालुका मागास होता परंतु सीना कोळेगाव धरणामुळे परंडा तालुक्यात ३ साखर कारखाने सुरू झाले. ऊस क्षेत्रातील वाढीबरोबर कारखान्यांच्या संख्येत वाढ होत आहे.

**भैरवनाथ साखर कारखाना :**

भैरवनाथ साखर कारखाना प्रामुख्याने ऊस उत्पादक क्षेत्रात उभारण्यात आला असून सन २००९ साली प्रथम गाळप सुरू झाले. सुरूवातीला दैनिक गाळप क्षमता २५०० मे. टन होती. ती आता ३५०० मे. टन करण्यात आली आहे.

आकृती क्र. 2 भैरवनाथ साखर कारखाना, सोनारी



संदर्भ : भैरवनाथ साखर कारखाना वेबसाईट

सोनारी येथील भैरवनाथ साखर कारखान्याने १ लाख २२ हजार ८२० मेट्रीक टन ऊसाचे गाळप करीत ९६ हजार ७०० क्विंटल साखर उत्पादीत केली आहे. (२०१७-१८). ऊस तोडणी व वाहतूक करण्यासाठी ट्रक, ट्रॅक्टर आणि बैलगाडी अशी यंत्रणा आहे. साखर कारखाना क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या कामाच्या स्वरूपात आर्थिक मोबदला दिला जात आहे. परिणामी लोकांच्या उत्पन्नात वाढ होत आहे.

भैरवनाथ साखर कारखाना खाजगी मालकीचा आहे. साखर कारखान्यात साखर उत्पादनाबरोबर डिस्टिलरी प्रोजेक्ट, रिफाइनरी शुगर प्रोजेक्ट, वीजनिर्मिती प्रकल्प, आॅक्सिजन आणि मळी प्रकल्प सुरू आहेत. भैरवनाथ साखर कारखाना सोनारी येथे १४.५ मे. वॅट वीज निर्मिती केली जाते. तसेच इथेनॉल उत्पादन ही घेतले जाते.

**बाणगंगा साखर कारखाना:**

बाणगंगा साखर कारखाना परंडा तालुक्यातील दुसरा साखर कारखाना असून या कारखान्याची गाळप क्षमता ३५०० मे. टन असून सन २०२१-२२ वर्षात ५ लाख ३०३ टन उसाचे गाळप करून ६ लाख २४ हजार २३० क्विंटल साखर उत्पादन घेतले.

**ऊस क्षेत्र वाढीस पोषक घटक :**

परंडा तालुक्यात सुपीक रेगूर मृदा असून सीना नदी व तिच्या उपनद्याच्या प्रदेशात गाळाची काळी मृदा आढळते. डोमगाव आणि कोळेगाव दरम्यान सीना नदीवर धरण बांधण्यात आले असून उपसा कॅनाल सिंचन पद्धतीचा अवलंब करून संपुर्ण तालुका ओलिताखालील आणण्यात आला आहे. नळी, दुधी, चांदणी या नद्यांवर धरण बांधण्यात आलेली असून परंडा तालुक्याच्या दक्षिणेस सीना-वजनी बोगदा आहे. जलसिंचन सुविधेमुळे तालुक्यात दरवर्षी ऊसाच्या क्षेत्रात विक्रमी वाढ होत आहे.

**ऊस लागवडीस पोषक वातावरण :**

परंडा तालुक्यात २००८ पुर्वी एकही कारखाना नव्हता. जलसिंचन सुविधा नसल्याने ऊसाचे क्षेत्र कमी होते. कमी पाण्यावर येणारी पीके घेतली जात होते. परिणामी तालुक्यातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न कमी होते. वजनी-सीना बोगदा, सीना कोळेगाव, चांदणी, साकत, खंडेश्वरवाडी, पांढरेवाडी, इनगोंदा-आनाळा या धरणामुळे ऊस लागवड क्षेत्र वाढले आहे.

**शेती विकास योजना:**

ऊस शेतीचे दर हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सरकार करत आहे. खोडवा ऊस व्यवस्थापन करताना शेतकऱ्यांनी ऊस पाचाट जाळू नये यासाठी साखर कारखाने जनजागृती करतात. सुधारित बेने योजनेतंर्गत साखर कारखाने सभासदांना जास्त शर्करायुक्त व लवकर परिपक्व होणाऱ्या बेणे वाटप करतात. लागवड पध्दतीत सुधारणा, ऊस संशोधन केंद्राने शिफारस केलेली ऊसाच्या जातीची लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. रासायनिक खताऐवजी कंपोस्ट खत वापरण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

माती परीक्षण, वायोकंपोस्ट बॅग, ठिबक सिंचन अनुदान, सौर पंप योजना या माध्यमातून सरकार आणि साखर कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सहकार्य करत आहेत. यादवारे दर हेक्टरी ऊस उत्पादकता वाढवली जात आहे. पर्यावरण संरक्षण करण्यासाठी साखर कारखाने शेतकऱ्यांना विविध फळझाडे लागवड करण्यासाठी आर्थिक मदत करत आहे.

**सामाजिक कार्य:**

साखर उद्योगामुळे ग्रामीण भागाचा सामाजिक विकास होत आहे. सामाजिक बांधिलकीतून साखर कारखाने सामुहिक विवाह सोहळा, रक्तदान शिबीर, अपंग उपचार कार्यक्रम, नेत्रदान, तसेच जेष्ठ शेतकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी, मुलींच्या जन्मदरात वाढ होण्यासाठी पहिल्या मुलींच्या नावाने सुरक्षितठेव योजना, माता आरोग्य तपासणी, महिलांना मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण दवारे ग्रामीण भागातील लोकांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

**साखर उदयोगाच्या समस्या:**

१. हंगामी मान्सून पर्जन्यामुळे ऊस क्षेत्रात अचानक घट होते.
२.साखर आणि ऊस दराबाबत कायम अनिश्चितता.
३.ऊस शेतकऱ्यांना मिळणारा अपुरा परतावा.
४.बॅंकाकडून कारखान्यांना मिळणारी अपुरी आर्थिक मदत.
५.वाढत्या महागाईमुळे ऊस उत्पादन खर्चात होणारी वाढ.

६.अतिरिक्त ऊसाचा प्रश्न दरवर्षी निर्माण होत आहे.

७.ऊसतोड कामगारांचा तुटवडा निर्माण होत आहे.

**साखर उद्योगाच्या समस्यावर उपाय :**

१. साखर कारखान्यांनी खर्च आधारित आधारभूत किंमत धोरण जाहीर करावे.

२.शेतकऱ्यांची देणी देण्यासाठी बॅकाकडून अतिरिक्त भांडवल मिळावे.

३.कारखान्यांची गाळप क्षमता व कालावधीत वाढ करावी.

४.साखर निर्यातीवरील निर्बंध कमी करावेत.

५.अतिरिक्त ऊस प्रश्न सोडविण्यासाठी साखर कारखान्यांना वीज आणि इथेनॉल निमिर्तीस प्रोत्साहन द्यावे.

६. इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांचा वापर साखर कारखान्यांनी करावा.

७.पेट्रोल आणि डिझेलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण ५० टक्के पर्यंत वाढवावे.

८.दर हेक्टरी ऊस उत्पादन वाढविण्यासाठी शेतकरी मार्गदर्शन शिबीरे आयोजित करावी.

**निष्कर्ष:**

१.साखर कारखान्यामुळे शेतकरी ऊस शेतीकडे आकर्षित होत आहेत.

२.कमी पर्जन्य असलेल्या प्रदेशात साखर उद्योग सुरू होत आहेत.

३.साखर कारखान्यात ऊसापासून उप उत्पादन प्रकल्प सुरू झाल्यानं लोकांना रोजगार मिळाल्याने ग्रामीण बेरोजगारी कमी झाली आहे.

४.इथेनाल, वीज, मळी यासारख्या उप उत्पादनामुळे इंधन समस्येवर तोडगा काढण्यास साखर कारखाना यशस्वी होत आहेत.

५. साखर कारखान्याबरोबरच इतर पुरक उद्योग परंडा तालुक्यात सुरू होत आहेत.

६. साखर कारखान्यामुळे परंडा तालुक्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढले असून राहणीमानात सुधारणा झाली आहे.

७. परंडा तालुक्यात साखर उद्योगामुळे सामाजिक आणि आर्थिक विकासास गती मिळाली आहे.

**समारोप:**

परंडा तालुक्यात साखर कारखान्याचे परिणाम सकारात्मक दिसून येत असून अनेक लोकांना रोजगार दिला आहे. भविष्यात साखर कारखान्याची गाळप क्षमतेतील वाढीबरोबरच रोजगारातही वाढ होणार आहे. साखर उद्योगामुळे ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन होत आहे. कारखान्यांना पुरक सेवा देणारे अनेक लघु उद्योग परंडा तालुक्यात येत आहेत. जड वाहने पुरवठादार, शेती यंत्रे उत्पादन

उद्योग, आॅटोमोबाईल उद्योग, पेट्रोल पंप, बँकींग व मार्केटिंग सेवा देणाऱ्या कंपन्या, वाहन खरेदी-विक्री सेंटर, वाहन दुरूस्ती सेंटर(गॅरेज), हाॅटेल आणि इतर पुरक सेवा देणारे उद्योग तालुक्यात सुरू झाले आहेत. या सर्व उपक्रमामुळे बेरोजगार लोकांना रोजगार उपलब्ध होत असून त्यांचे दरडोई उत्पन्न वाढत आहे.

एकंदरीत साखर कारखान्यामुळे परंडा तालुक्यातील गरीबीचे प्रमाण कमी होत असून अवैध धंदे, बेरोजगारी, कुपोषण, बालमृत्यू, माता मृत्युच्या संख्येत घट झाली असून सर्व भागाचा सर्वांगिण विकास होत आहे. वीज, इथेनॉल निर्मितीमुळे साखर कारखाने शेतकऱ्यांना जास्त भाव देणारे उद्योग ठरत अाहे. साखर उद्योगामुळे ग्रामीण उद्योगांना नवसंजीवनी मिळली आहे. बंद पडलेले प्रकल्प पुन्हा सुरू होत आहेत.

**संदर्भ:**

१.वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी, पुणे
२.कृषी विभाग, महाराष्ट्र शासन
३.भारताचा आर्थिक पाहणी अहवाल
४. खतीब के. ए, भारताचा भूगोल
५.न्युज पेपर
६.इंटरनेटवरील माहिती.